# भुयारी मेट्रोची प्रगती ७६ टक्के

**लोकमत न्यूज नेटवर्क। मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशातील पहिल्यावहिल्या भुयारी मेट्रोच्या कामाची प्रगती ७६.६ टक्के एवढी झाली आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे या मेट्रो - ३ चे काम करण्यात येत असून, नागरी कामे, स्थानकांची बांधकामे, भुयारी कामे, यंत्रणांची कामे आणि ट्रॅकच्या कामांचा यात समावेश आहे. याच वेगाने कामे सुरु राहिली तर भुयारी मेट्रोचा पहिला टप्पा लवकरच सुरु होईल, असा दावा कॉर्पोरेशनने केला आहे.



| | |
|---|---|
| ८७.३% | नागरी कामे |
| ८६.१% | स्थानकांची कामे |
| ९९.६% | भुयारी कामे |
| ४२.२% | यंत्रणांची कामे |
| ४५% | ट्रॅकची कामे |



- बीकेसी ते सीप्झ हा पहिला टप्पा जून २०२३ दरम्यान सुरु होणार आहे.
- मेट्रो ३ च्या पूर्णत्वानंतर १७ लाख प्रवासी प्रवास करु शकणार.
- मुंबई मेट्रो लाइन ३ च्या ट्रेन ८ डब्यांच्या असतील.

**२४००** प्रवासी एका गाडीतून प्रवास करु शकतील

**३३.५किमी** मुंबई मेट्रो मार्ग ३ ची एकूण लांबी

**२६** भुयारी

**१** जमिनीवरील

**स्थानके**

**पहिला टप्पा — आरे ते बीकेसी**

| | |
|---|---|
| स्थानके आणि भुयारी कामे | ९६.२ |
| स्थानकांची बांधकामे | ८१.२ |
| प्रकल्पाची प्रगती | ८० |
| यंत्रणांची कामे | ५१.८ |
| ट्रॅकची कामे | ५०.४ |

**दुसरा टप्पा — बीकेसी ते कफ परेड**

| | |
|---|---|
| स्थानके आणि भुयारी कामे | ९२.६ |
| यंत्रणांची कामे | ३८.१ |
| स्थानकांची कामे | ८२.९ |
| ट्रॅकची कामे | ४१.९ |

## काय आहे दावा?

मुंबईकरांसाठी नव्याने लाइफलाइन ठरणारा मेट्रो ३ प्रकल्प सार्वजनिक वाहतुकीची सुविधा देण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करणारा ठरेल.

- नरिमन पॉइंट, वरळी, वांद्रे - कुर्ला संकुल व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विमानतळ, मरोळ औद्योगिक वसाहत, सीप्झ अशी महत्त्वाची केंद्रे मेट्रोने जोडली जातील.